5

# <u>नाशिक महानगरपालिका, नाशिक</u>

नाशिक महानगरपालिका कार्यालय
जा.नं./नगररचना विभाग/अंतीम/पंन्च/सी१/22
दिनांक:- ९ /६ /२०१३

प्रति,

श्री. सुभाष शंकर काश्यपे व इतर,
व्दारा - इंजी. सुनिल वणीकर, नाशिक.

<u>विषय:-</u> **नाशिक** शिवारातील स. नं. २७८/२/१(पैकी), प्लॉट नं. ०१ ते ०८ व मोजणी नकाशाप्रमाणे रेव्हेन्यू रेकॉर्डवरील ७/१२ उताऱ्याप्रमाणेचे जागेतील अंतिम मंजूर लेआऊट नकाशा मंजूर करणेबाबत.

<u>संदर्भ:-</u> तुमचा दि. १२/०२/२०१३ चा अर्ज व नकाशे आ.क्र. सी-१/एफएल/३७....

महाशय,

वरील संदर्भान्वये कळविण्यात येते की, **नाशिक** शिवारातील स. नं. २७८/२/१(पैकी), प्लॉट नं. ०१ ते ०८ मोजणी नकाशाप्रमाणे व ७/१२ च्या उताऱ्याप्रमाणे जागेतील नियोजित लेआऊटचा नकाशा तांत्रिकदृष्टया योग्य असल्याने त्यास इकडील जा. क्र. सी१/८२, दिनांक: ०१/०१/२०१० अन्वये तात्पुरता अभिन्यास मंजूर शर्त नंबर ०१ ते २० अनुसार मंजूरी देणेत आली होती. त्यानंतर तुम्ही सदर शर्तीनुसार सदर नियोजित लेआऊट प्रमाणे प्रत्यक्ष जागेवर मोजणी करुन, प्लॉटस् रस्ते व खुली जागा यांचे हददीचे कायमचे दगड रोवून सदर कॉलनी मध्ये कॉलनी रस्ते तयार करुन दिले आहे. त्याचप्रमाणे **पथदीप व पाणी पाईप लाईनकरीता** त्याकरीता विकास शुल्क करीता रक्कम रुपये २,४२,६००/- पावती क्र./बुक ०५१/५१५, दिनांक: १३/०५/२०१३ अन्वये या कार्यालयात भरलेली आहे.

सबब तुम्ही सदर नियोजित टेंटटिव्हली मंजूर लेआऊटचे शर्तीनुसार योग्य ती पूर्तता केलेली असल्याने सदर जागेतील लेआऊटच्या नकाशास अंतिम मंजूरी (फायनल लेआऊट) खालील शर्तीवर देण्यात येत आहे.

<u>:: शर्ती ::</u>

१. सदर कॉलनीतले प्लॉट, रस्ते व खुली जागा यांचे हददीचे दगड हालवू नये व मंजूर लेआऊट प्रमाणे कोणतेही प्लॉटचे क्षेत्र जागेवर प्रत्यक्ष मोजले असता कमी अधिक भरता कामा नये.
२. मंजूर लेआऊट मधील कोणत्याही प्लॉटचा उपयोग फक्त राहणेसाठी करावा. अन्य कोणताही वापर या कार्यालयाची परवानगी घेतले शिवाय करु नये.
३. मंजूर लेआऊट मधील कोणतेही प्लॉटचे यापुढे उपविभाजन करणे किंवा एकत्रीकरण करणे झाल्यास इकडील पूर्व परवानगीशिवाय करु नये.
४. मंजूर लेआऊटमधील प्लॉटमध्ये बांधकाम करणेपूर्वी या कार्यालयाची पूर्व परवानगी (बांधकाम परवानगी) घेतल्याशिवाय कोणतेही बांधकाम करु नये.
५. सदर कॉलनी मध्ये तुम्ही पाण्याची लाईनसाठी रक्कम भरलेली असली तरी म. न. पा. ची सदर भागातील पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्याखेरीज पुर्ण कॉलनीत पाणी पुरवठा केला जाणार नाही.

6



६. मंजूर लेआऊट मधील खुली जागा, कॉलनी रोड व डी. पी. रोड महानगरपालिकेच्या ताब्यात दि. २०/०१/२०१३ रोजी खुल्या जागेचे (ओपन स्पेस) क्षे. ४००.०० चौ. मी., कॉलनी रोडचे क्षेत्र ७३६.३० चौ. मी. व डी. पी. रोडचे क्षेत्र -- चौ. मी. उपरोक्त करारान्वये हस्तांतरीत केलेले आहे.

७. सदर लेआऊटमध्ये रस्ता पुर्णत्वाचा दाखला बांधकाम विभागाचे पत्र क्र. पंच/४०८/२०१३, दिनांक: २६/०३/२०१३ अन्वये घेतलेला आहे.

८. सदर अभिन्यास हा ना. ज. क. म. कार्यालयाकडील पत्र क्र. -- दि. --- यास अधिन राहून देणेत येत आहे.

९. सदरच्या मिळकतीस बिनशेती परवानगी मा. जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्र. मह/ कक्ष-३/४/बि. शे. प्र. क्र./३०/२०१०, दिनांक: १८/७/२०११ अन्वये मिळालेली आहे.

१०. अंतिम अभिन्यासानुसार तालुका भुमि निरिक्षक, नाशिक यांचेकडून मोजणी करुन तसा मोजणी/सिमांकित नकाशा बांधकाम परवानगीपुर्वी या कार्यालयाकडे सादर करावा. अन्यथा सदरचा अभिन्यास रद्द करणेत येईल.

११. सदर अभिन्यासातील खुली जागा, कॉलनी रोड व डी. पी. रोड यांचे स्वतंत्र ७/१२ चे उतारे नाशिक महानगरपालिकेचे नांवे लावून बांधकाम परवानगीपुर्वी या कार्यालयात सादर करावे.

वरील शर्तीनुसार सदरचे लेआऊट नकाशास अंतीम मंजूरी देणेत येत आहे. सोबत मंजूर लेआऊट नकाशाच्या प्रति जोडल्या आहेत.

सहाय्यक संचालक,नगररचना
नाशिक महानगरपालिका,नाशिक.

<u>प्रत माहितीसाठी:-</u>

१. मा. जिल्हाधिकारी सो. नाशिक.
२. मा. अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी,ना.ज.क.म. नाशिक.
३. सहाय्यक संचालक नगररचना, नाशिक शाखा, नाशिक.
४. अध्यक्ष आर्कि. व इंजि. असोसिएशन, नाशिक.